CNR NO. MHAH-20-000140-2016

**ORDER PASSED BELOW EXH.31 IN REG.C.S NO. 394 of 2016.**
**Sopan Late + 3 Vs. Laxman Late + 7**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांचेतर्फे मयत प्रतिवादी क्र. ७ मच्छिंद्र रामभाउ लाटे यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत व त्याप्रमाणे दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे अर्जातील संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे :-

वादी यांनी, प्रतिवादींविरुध्द वाद मिळकतीबाबत कायम मनाई हुकूम मिळण्याकरीता सदरचा दावा दाखल केला आहे. दावा न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्र. ७ मच्छिंद्र रामभाउ लाटे हे येथे दिनांक ०९/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. ९० दिवसांचे आंत मयत प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे परंतू, प्रतिवादी क्र. ७ यांचे मृत्यू प्रमाणपत्र उशिराने प्राप्त झाल्याने मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस अभिलेखावर आणण्याकरीता विलंब झाला त्याकरीता निशाणी २९ वरील आदेशान्वये विलंब माफ होवून अर्ज मंजुर करण्यात आला आहे. अर्जात नमूद पक्षकार हे मयत प्रतिवादी क्र. ७ यांचे कायदेशिर वारस आहेत. त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. त्यामूळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. करिता हा अर्ज.

३. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूरीस हरकत घेतली आहे.

४. वादींतर्फे अर्जाच्या पृष्टयर्थ निशाणी ३२ वर वादी क्र. १ सोपान भाउसाहेब लाटे यांचे शपथपत्र सादर केले आहे. तर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्याचे पृष्टयर्थ्य कोणतेही शपथपत्र दाखल केले नाही.

५. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीबाबतचा दावा मिळकतीबाबत प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. याबाबत उभयपक्षांत दुमत नाही की, प्रतिवादी क्र. ७ मच्छिंद्र रामभाउ लाटे हे मयत झाले आहेत.

५. दाव्यातील कथन सिध्द् करण्याची जबाबदारी वादींवर आहे. अर्जातील नमूद कारण पहाता वादींनी केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. जरी दावा दुरुस्त केला तरी दाव्याचे स्वरुप बदलत नाही. वादींची जी मागणी आहे तिच मागणी कायम रहाते. तसेच प्रतिवादींच्या बचावातही फरक पडत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमूद कारण पाहता अर्ज मंजूरीस सबळ कारण दिसते. करीता आदेश.

**<u>आ दे श..</u>**

१. अर्ज निशाणी ३१ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी निशाणी ३१ मध्ये विनंती केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती १४ दिवसांचे आत करुन पूर्तता करुन दुरुस्त प्रत दाखल करावी, अन्यथा आदेश रद्दबातल समजण्यात येईल.

( ए.एस्. बिराजदार )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पाथर्डी.

दिनांक : २२/११/२०२२.